# सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लिमिटेड, यशवंतनगर

## ता. कराड, जि. सातारा

### आर्थिक वर्ष २०२०-२०२१

# ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांच्यासाठी)

यांना सप्रेम नमस्कार,

सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याची **५१ वी** वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दिनांक २४/१०/२०२१ रोजी दुपारी २.00 वाजता** यशवंतनगर येथे कारखाना कार्यस्थळावरील गेस्ट हाऊसमधील सेमीनार हॉलमधून **मा. चेअरमन नामदार श्री बाळासाहेब उर्फ शामराव पांडुरंग पाटील** यांच्या अध्यक्षतेखाली **ऑनलाईन पध्दतीने** खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलाविण्यात येत आहे. तरी सदर सभेस सभासदांनी ऑनलाईन सहभागी व्हावे; ही विनंती.

**- सभेपुढील विषय -**

१. मागील गुरूवार दिनांक २५ मार्च, २०२१ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.

२. अहवालसालातील संस्थेच्या कामकाजाबाबत संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्विकारणे व त्याची नोंद घेणे.

३. संस्थेच्या जमाखर्चाचा दिनांक ३१/०३/२०२१ रोजीचा ताळेबंद आणि दिनांक १/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ या कालावधीमधील नफा–तोटा पत्रक दाखल करून घेणे व स्विकारणे.

४. अहवालसालातील संस्थेच्या हिशोबांचा, सनदी लेखापरिक्षक मे. ए.डी.शिंदे आणि कंपनी, चार्टर्ड अकौन्टंटस्, कोल्हापूर यांच्याकडून आलेला लेखापरिक्षण अहवाल दाखल करून घेणे व त्यावरील संचालक मंडळाने सादर केलेला दोष दुरूस्ती अहवाल स्विकारणे.

५. सन २०२१–२०२२ सालासाठी संचालक मंडळाने सादर केलेले संस्थेचे अंदाजपत्रक भाग १, १अ व २ आणि त्यामध्ये भांडवल उभारणीसाठी सुचविलेल्या उपाययोजना यांची नोंद घेणे.

६. मा. संचालक मंडळाचा ठराव नं. ५/१२ दिनांक ३/०९/२०२१ अनुसार, संस्थेच्या सन २०२१–२०२२ सालाच्या हिशोबांचे लेखापरिक्षण करून घेण्यासाठी शासनमान्य पॅनलवरील लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे, व त्यांचा मेहनताना ठरविण्याबाबत विचार करणे.

७. मा.संचालक मंडळाचा ठराव नं. ५/१० दिनांक ३/०९/२०२१ अनुसार, वार्षिक अहवालासोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे भागाची दर्शनी किंमत रूपये १०,०००/– वरून रूपये १५,०००/– करणेबाबतच्या पोटनियम दुरूस्ती मसूद्यास मंजूरी देणेबाबत विचार करणे.

८. संस्थेच्या सन २०२०–२१ सालातील ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांना क्षमापित करण्याबाबत विचार करणे.

९. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने योग्यरित्या सभेपुढे आलेल्या विषयांचा विचार करणे.

जावक क्र. : ३७९०
दिनांक : ०९/१०/२०२१
यशवंतनगर

संचालक मंडळाचे आदेशावरुन
**आबासाहेब जो. पाटील**
कार्यकारी संचालक

टिप :१) कोवीड – १९ या संसर्गजन्य आजाराचे पार्श्वभूमीवर शासनाच्या दिनांक ८/०३/२०२१ रोजीच्या आदेशानुसार वार्षिक सर्वसाधारण सभा ऑनलाईन पध्दतीने व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बोलाविण्यात येत आहे. तरी सभासदांनी ऑनलाईन सभेमध्ये सहभाग घेण्यास सभेस लिंक करून घेण्यास स्वत:चा अ‍ॅन्ड्रॉईड मोबाईल नंबर व ई–मेल आयडी दिनांक २२/१०/२०२१ रोजी दुपारी ३.00 वाजेपर्यंत कारखाना मुख्य कार्यालय अथवा संबंधीत शेती विभागीय गट कार्यालय येथे लेखी नोंदवावा.

२) मा.सभासदांना कारखान्याच्या कामकाजासंबंधी काही धोरणात्मक सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक २२/१०/२०२१ अखेर कारखान्याकडे लेखी पाठवाव्यात.

३) वार्षिक अहवाल शेती खात्यामार्फत घरपोहोच पाठविण्याची व्यवस्था केली आहे.

४) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याचदिवशी अर्ध्या तासानंतर होईल; त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.